| विषय क्र. ०१. दि. २५ मे, २०२२. | **घणसोली सेंट्रल पार्क मधील जलतरण तलाव वापराबाबत धोरण व भाडेशुल्क निश्चित करणेबाबत, आयुक्तांचे दिनांक २३/०५/२०२२, चे पत्र जा.क्र.नमुंमपा/क्रिडा व सांस्कृ/ ३६९/२०२२.** |
|---|---|
| ठराव क्रमांक २३३४ | "**उपरोक्त संदर्भात घणसोली सेंट्रल पार्क मधील जलतरण तलाव वापराबाबत धोरण व भाडेशुल्क निश्चित करणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे,** नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने घणसोली सेक्टर-०३, येथील सेंट्रल पार्क मध्ये नव्यानेच मिनी ऑलम्पिक साईजचे जलतरण तलाव विकसीत करण्यात आलेले आहे. सदरहू ठिकाणी दर्जेदार सुविधा व व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदर जलतरण तलावाचा वापर यथा योग्य होणे अत्यंत गरजेचे आहे.<br>सदरहू जलतरण तलाव वापराचे नियम व भाडे शुल्क निश्चित करणे प्रस्तावित असून सदरहू सुविधा सदैव सुस्थितीत रहावे आणि देखभाल दुरुस्तीकरीता येणा-या खर्चाकरीता निधीसुध्दा उपलब्ध व्हावा या हेतूने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ७९ (क) व (ड) मधील तरतुदीनुसार **वापर व भाडे दर निश्चितीचा प्रस्ताव** मंजुरीकरीता सादर करण्यात येत आहे.<br>**अटी व शर्ती**<br>1. जलतरण तलावात प्रवेश करण्यापुर्वी अंगावर शॉवर घेऊनच पोहण्यासाठी पाण्यात उतरणे बंधनकारक राहील.<br>2. पोहण्यासाठी स्वच्छ गडद रंगाचा जाड कापडाचा कॉश्चुम/पोहण्याचा पेहराव वापरणे आवश्यक आहे.<br>3. तरण तलावाच्या पाण्यात अथवा तरण तलावाच्या आवारात थुंकणे,नाक शिंकरणे, तोंडाने पाण्याचा चुळा फेकणे या गोष्टी करण्यास सक्त मनाई असेल.<br>4. ज्यांना त्वचेचे रोग असतील, सर्दी झालेली असेल,कान वाहत असतील अशांनी तलावात उतरु नये, अशांना पोहण्यास मनाई राहील.<br>5. शरीराला तेल लावून पोहण्यासाठी तरण तलावात उतरता येणार नाही.<br>6. नव्याने शिकाऊ ७ वर्षापर्यंतची मुले-मुली जलतरण शिक्षकांच्या निगराणी खालीच तलावात प्रवेश करतील. त्याचबरोबर ७ वर्षावरील ज्यांना पोहता येत नाही, अशांनी जलतरण शिक्षकांच्या परवानगी शिवाय तलावात प्रवेश करु नये.<br>7. लांब केस असणा-या व्यक्तीने पोहताना केस मोकळे सोडून पोहता येणार नाही. त्यासाठी पोहताना वापरावयाची टोपी घालणे बंधनकारक राहील.<br>8. पोहण्यासाठी सभासद होण्यापुर्वी वैद्यकीय अधिका-यांची शारीरिक वैद्यकीय तपासणी करुन घेणे आवश्यक राहील. पाण्यात पोहण्यासाठी सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावा लागेल.<br>9. जलतरण तलाव महत्वाच्या दिवशी (उदा-होळी, धुलीवंदन अशा दिवशी) अथवा अपवादात्मक परिस्थितीत बंद ठेवण्याचे अधिकार मा.आयुक्त यांनी प्राधिकृत केलेल्या विभाग प्रमुखांस राहतील.<br>10. पोहण्याचे विशिष्ट गणवेश (Swimmimg costume) परिधान केल्याशिवाय तरण तलावात प्रवेश करण्यास सक्त मनाई असेल. आपआपले दागदागिने, मौल्यवान वस्तु,मोबाईल इ. स्वत:च्या जबाबदारीवर ठेवावेत. हरविल्यास त्यास मनपा कार्यालय अथवा कर्मचारी जबाबदार राहणार नाही.<br>11. पोहता येत नसेल तर एकटयाने पोहण्याचा प्रयत्न करु नये.आपल्या पोहण्याच्या क्षमतेची जाणीव ठेवूनच मर्यादीत वेळेपर्यंत व अतंरापर्यंतच राहून पोहणे सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य राहील.<br>12. पोहण्यापुर्वी प्रमाणापेक्षा जास्त आहार घेऊन नये, त्यामुळे पाण्यात स्नायू युक्त गोळे येणेची शक्यता असते. भरल्यापोटी पोहणे टाळावे.<br>13. पोहण्यासाठी पाण्यात उतरण्यापुर्वी शरीरात योग्य ते तापमान निर्माण होण्यासाठी योग्य तेवढा वार्मअप करावा परंतु इतर खेळ खेळल्याने शरीराचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले असतांना व दमलेले असतांना पोहण्यासाठी पाण्यात उतरणे धोक्याचे असल्याने पाण्यात उतरु नये.<br>14. आपणास ज्यावेळी उंचीवरुन सुर उडी पाण्यात मारायची असेल, तेंव्हा त्या भागात दुसरा कोणी नाही याची खात्री करुन घेऊनच उडी मारावी,यामध्ये आपणास व दुस-यांना इजा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>15. गेस्ट तिकीट फक्त पोहता येत असेल त्यांनाच देण्यात येईल.<br>16. प्रत्येकांने स्वत:च्या जबाबदारीवरच पोहावे जिवितास कांही झाल्यास महापालिका जबाबदार असणार नाही.<br>17. तरण तलावाच्या आवारात कोणासही परवानगी शिवाय प्रवेश करण्यास सक्त मनाई असेल.<br>18. ओळखपत्राशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.<br>19. जलतरण तलाव सराव/स्पर्धा आयोजना दरम्यान व नंतर त्याठिकाणी स्वच्छता व सुव्यवस्था राहील याची संपुर्ण जबाबदारी संबंधित अर्जदारांची राहील. संबंधितांकडून तसे न झाल्यास अनामत रक्कमेमधून दंडात्मक रक्कम वसुल करण्यात येईल.<br>20. अनामत रक्कम हे भाडे शुल्कासोबत एकत्रित महापालिकेच्या नावे जमा करावे लागतील. सदरचे अनामत रक्कम ही सुविधा वापराअंती शहानिशा करुन संबधीतांस परत केला जाईल.<br>21. महापालिकेच्या स्पर्धा/कार्यक्रमाकरीता तसेच महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना सदरहू क्रीडा सुविधा विनामुल्य राहील.<br>22. ज्या स्पर्धा/सरावाकरीता आरक्षण केलेले आहे, तो रद्द झाल्याचे संबंधितांनी आरक्षण दिवसाच्या १० दिवस अगोदर कळविल्यास भाडे रक्कमे मधून २५%, ७ दिवस अगोदर कळविल्यास ४०% व ०५ दिवस |

अगोदर कळविल्यास ५०%एवढी रक्कम वसूल करण्यात येईल व त्यानंतर आरक्षण रद्द झाल्याचे कळविल्यास संपुर्ण भाडे रक्कम जप्त करण्यात येईल व त्याबदल्यात इतर कोणताही दिवस दिला जाणार नाही.

23. सदर सुविधा Online पध्दतीनेसुध्दा प्रथम आरक्षित करण्या-यास प्रथम प्राधान्याने सशुल्क उपलब्ध राहील.

24. कोणतेही कारण न देता १० दिवस अगोदर नोटीसीद्वारे आरक्षण रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

25. नवी मुंबई महानगरपालिका आयोजित वा पुरस्कृत स्पर्धा/कार्यक्रमांना सदर सुविधांची आवश्यकता असल्यास दिलेले आरक्षण रद्द करण्याचा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे.

26. जलतरण तलाव परिसरात मादक व प्रतिबंधीत द्रव्य/वस्तु बाळगणे अथवा त्यांचे सेवन करणे यास सक्त मनाई असेल. तसे आढळून आल्यास अशा संस्था/क्लब/ खेळाडू/ प्रेक्षक यांना सदर ठिकाणी प्रवेश नाकारला जाईल व आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

27. जर शाळा/विद्यालयातील विद्यार्थी यांनी सराव/स्पर्धांकरीता आरक्षित केले असल्यास सदर सुविधा वापरतांना ओळखपत्र असणे बंधनकारक राहील. संबंधित प्राधिकृत ओळखपत्रा शिवाय प्रवेश देण्यात येणार नाही.

28. जलतरण तलाव वापराचे दिनांक, वेळ यांचेमध्ये कोणताही बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना असतील. मात्र भाडे शुल्क ठरविण्याचे अधिकार मा.महापालिका सभेस असतील.

29. भाडयाने देण्याचे सर्वाधिकार क्रीडा विभागाचे विभाग प्रमुख यांना राहतील तथापी विभागप्रमुखांच्या अनुपस्थितीत/रजा कालावधीत किंवा विशिष्ठ परिस्थितीत सदरचे अधिकार कार्यालय प्रमुखांना असतील.

30. जलतरण तलावावर चित्रिकरण करावयाचे झाल्यास त्याबाबत इतर शासकीय विभागाचे आवश्यक अनुज्ञाप्ती,ना-हरकत दाखले/परवाने घेण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

31. जलतरण तलावावर लग्न समारंभ, जाहिर सत्कार, राजकीय सभा, सत्संग, मेळावे, ऑर्केस्ट्रा, धार्मिक कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमांना परवानगी देण्यात येणार नाही.

सदरहू जलतरण तलाव वापराकरीता खालील प्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

**नमुंमपा घणसोली, से-३ येथील सेंट्रल पार्क मधील जलतरण तलाव वापराबाबतचे प्रस्तावित शुल्क दर.**

<table>
<tr><th rowspan="2">अ.क्र.</th><th rowspan="2">सेवा</th><th colspan="3">प्रस्तावित दर (रु.)</th><th rowspan="2">सुरक्षा अनामत रक्कम (रु.)</th></tr>
<tr><th>सन २०२२-२३</th><th>सन २०२३-२४</th><th>सन २०२४ -२५</th></tr>
<tr><td>१.</td><td>प्रवेश शुल्क वार्षिक</td><td>४८०/-</td><td>५३०/-</td><td>५८०/-</td><td>---</td></tr>
<tr><td rowspan="2">२.</td><td>१. वार्षिक सभासद शुल्क<br>(वय ५ ते १५ वर्षापर्यंत, जेष्ठ नागरिक, राष्ट्रीय खेळाडू, महापालिका अधिकारी/ कर्मचारी)</td><td>२५००/-</td><td>२७५०/-</td><td>३०२५/-</td><td>---</td></tr>
<tr><td>२. वार्षिक सभासद शुल्क (वय १५ वर्षावरील)</td><td>५०००/-</td><td>५५००/-</td><td>६०५०/-</td><td>---</td></tr>
<tr><td>३.</td><td>जल निर्देशक (कोचिंग) शुल्क वार्षिक</td><td>५००/-</td><td>५५०/-</td><td>६०५/-</td><td>---</td></tr>
<tr><td>४.</td><td>ओळखपत्र शुल्क</td><td>३००/-</td><td>३३०/-</td><td>३६५/-</td><td>---</td></tr>
<tr><td>५.</td><td>पालकांकरीता प्रवेश शुल्क वार्षिक</td><td>६००/-</td><td>६६०/-</td><td>७३०/-</td><td>---</td></tr>
<tr><td>६.</td><td>आकस्मीत (गेस्ट) पोहण्याचे शुल्क ताशी</td><td>१००/-</td><td>११०/-</td><td>१२०/-</td><td>---</td></tr>
<tr><td>७.</td><td>गॅलरी शुल्क</td><td>१०००/-</td><td>११००/-</td><td>१२००/-</td><td>---</td></tr>
<tr><td>८.</td><td>वार्षिक सभासद अर्ज शुल्क</td><td>१५०/-</td><td>१६५/-</td><td>१८५/-</td><td>---</td></tr>
<tr><td>९.</td><td>लॉकर शुल्क वार्षिक</td><td>९००/-</td><td>९९०/-</td><td>१०९०/-</td><td>---</td></tr>
<tr><td>१०.</td><td>लॉकर अनधिकृत वापर दंड वार्षिक</td><td>१८००/-</td><td>१९८०/-</td><td>२१८०/-</td><td>---</td></tr>
<tr><td>११.</td><td>क्रीडा स्पर्धा आरक्षण ताशी शुल्क</td><td>३०००/-</td><td>३३००/-</td><td>३६३०/-</td><td>५०००/-<br>स्पर्धा कालावधीसाठी</td></tr>
<tr><td>१२.</td><td>शासन मान्यता प्राप्त शाळा/संस्था स्पर्धेकरीता ताशी शुल्क</td><td>२०००/-</td><td>२२००/-</td><td>२४२०/-</td><td>५०००/-<br>स्पर्धा कालावधीसाठी</td></tr>
<tr><td>१३.</td><td>शासन मान्यता प्राप्त शाळा/संस्था<br>(मासिक आरक्षण- प्रति दिन प्रति तास)<br>(फक्त मंगळवार ते शुक्रवार)</td><td>६०००/-</td><td>६६००/-</td><td>७२६०/-</td><td>१००००/-<br>मासिक कालावधीसाठी</td></tr>
<tr><td>१४.</td><td>आरक्षण जलजीवरक्षक (२) ताशी शुल्क</td><td>१५००/-</td><td>१६५०/-</td><td>१८१५/-</td><td>---</td></tr>
<tr><td>१५.</td><td>नवीन ओळखपत्र (दुसरी प्रत)</td><td>३००/-</td><td>३३०/-</td><td>३६५/-</td><td>---</td></tr>
<tr><td>१६.</td><td>नुतनीकरण विलंब शुल्क</td><td>४००/-</td><td>४४०/-</td><td>४८५/-</td><td>---</td></tr>
<tr><td>१७.</td><td>सुटटीमधील विशेष प्रशिक्षण शुल्क</td><td>३०००/-</td><td>३३००/-</td><td>३६३०/-</td><td>---</td></tr>
<tr><td rowspan="4">१८.</td><td rowspan="4">चित्रीकरणासाठी (मराठी)<br>(मालिका/चित्रपट/ॲडफिल्म)<br>ताशी शुल्क</td><td>८०००/-</td><td>८८००/-</td><td>९६८०/-</td><td rowspan="4">रु.५००००/-<br>चित्रिकरण कालावधीसाठी</td></tr>
<tr><td colspan="3">(मंगळ. ते शुक्रवार)</td></tr>
<tr><td>१००००/-</td><td>११०००/-</td><td>१२१००/-</td></tr>
<tr><td colspan="3">(शनिवार,रविवार व सार्व.सुट्टी)</td></tr>
<tr><td rowspan="4">१९.</td><td rowspan="4">चित्रीकरणासाठी (मराठी व्यतिरिक्त)<br>(मालिका/चित्रपट/ॲडफिल्म) ताशी शुल्क</td><td>१२०००/-</td><td>१२१००/-</td><td>१३३१०/-</td><td rowspan="4">रु.५००००/-<br>चित्रिकरण कालावधीसाठी</td></tr>
<tr><td colspan="3">(मंगळ. ते शुक्रवार)</td></tr>
<tr><td>१४०००/-</td><td>१५४००/-</td><td>१६९४०/-</td></tr>
<tr><td colspan="3">(शनिवार,रविवार व सार्व.सुट्टी)</td></tr>
<tr><td>२०.</td><td colspan="5">उपरोक्त प्रस्तावित दरा व्यतिरिक्त वेळोवेळी लागू होणारे सर्व शासकीय कर लागू राहतील.</td></tr>
<tr><td>२१.</td><td colspan="5">१) शासन मान्यता प्राप्त शाळा/संस्थांना एका वेळी २० स्विमर्सना सरावाकरीता उपरोक्त अ.क्र.१४ प्रमाणे प्रति महिना दर राहील. २० स्विमर्स नंतर प्रत्येक स्विमर्स रु.५०/- प्रति तास प्रति दिन याप्रमाणे शुल्क राहील. एकावेळेस जास्तीत जास्त ३० स्विमर्स सराव करु शकतील.<br>२) अनामत रक्कम ही एका तासाकरीता भरुन पुढे सलग आरक्षण असल्यास आणि वापराच्या वेळेस कोणतेही नुकसान केले नसल्यास सदरचे अनामत रक्कम पुढील आरक्षणाकरीता असे एका महिन्यापर्यंत ग्राह्य धरण्यात येईल याकरीता पुन्हा स्वतंत्रपणे अनामत रक्कम भरणे अनिवार्य राहणार नाही. केवळ भाडे शुल्क भरावे लागेल.<br>३) ओळखपत्राची मुदत संपलेल्या दिनांक पासुन सात दिवसानंतर विलंब शुल्क आकारुन नुतनीकरण करण्यात येईल. मात्र मुदत संपल्या दिनांकापासून १५ दिवसानंतर नुतनीकरण केले जाणार नाही.<br>४) नवीन प्रवेश घेणा-या स्विमर्स सभासदांसाठी जलनिर्देशक (कोचिंग) शुल्क आकारण्यात येणार नाही.</td></tr>
</table>

तरी, उपरोक्त प्रस्तावित केल्याप्रमाणे जलतरण तलाव वापराचे धोरण सादर करण्यात येत असून

| | |
|---|---|
| | सदर अटी व शर्तीस अनुसरुन शुल्क दर लागू करण्यास, तसेच यापुढे दर तीन वर्षानी शुल्कामध्ये १०% टक्यांनी वाढ करण्यास, **प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. आयुक्त तथा मा. प्रशासक यांची प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी.”** |
| **निर्णय :** | **ठराव करण्यात येतो की,**<br>**घणसोली सेंट्रल पार्क मधील जलतरण तलाव वापराबाबत धोरण व भाडेशुल्क निश्चित करणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.**<br>**त्यानुसार विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक २३३४ अन्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे,** नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने घणसोली सेक्टर-०३, येथील सेंट्रल पार्क मध्ये नव्यानेच मिनी ऑलम्पिक साईजचे जलतरण तलाव विकसीत करण्यात आलेले आहे. सदरहू ठिकाणी दर्जेदार सुविधा व व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदर जलतरण तलावाचा वापर यथा योग्य होणे अत्यंत गरजेचे आहे.<br>सदरहू जलतरण तलाव वापराचे नियम व भाडे शुल्क निश्चित करणे प्रस्तावित असून सदरहू सुविधा सदैव सुस्थितीत रहावे आणि देखभाल दुरुस्तीकरीता येणा-या खर्चाकरीता निधीसुध्दा उपलब्ध व्हावा या हेतूने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ७९ (क) व (ड) मधील तरतुदीनुसार **वापर व भाडे दर निश्चितीचा प्रस्ताव** मंजुरीकरीता सादर करण्यात येत आहे.<br>**<u>अटी व शर्ती</u>**<br>१. जलतरण तलावात प्रवेश करण्यापुर्वी अंगावर शॉवर घेऊनच पोहण्यासाठी पाण्यात उतरणे बंधनकारक राहील.<br>२. पोहण्यासाठी स्वच्छ गडद रंगाचा जाड कापडाचा कॉश्चुम/पोहण्याचा पेहराव वापरणे आवश्यक आहे.<br>३. तरण तलावाच्या पाण्यात अथवा तरण तलावाच्या आवारात थुंकणे,नाक शिंकरणे, तोंडाने पाण्याचा चुळा फेकणे या गोष्टी करण्यास सक्त मनाई असेल.<br>४. ज्यांना त्वचेचे रोग असतील, सर्दी झालेली असेल,कान वाहत असतील अशांनी तलावात उतरु नये, अशांना पोहण्यास मनाई राहील.<br>५. शरीराला तेल लावून पोहण्यासाठी तरण तलावात उतरता येणार नाही.<br>६. नव्याने शिकाऊ ७ वर्षापर्यंतची मुले-मुली जलतरण शिक्षकांच्या निगराणी खालीच तलावात प्रवेश करतील. त्याचबरोबर ७ वर्षावरील ज्यांना पोहता येत नाही, अशांनी जलतरण शिक्षकांच्या परवानगी शिवाय तलावात प्रवेश करु नये.<br>७. लांब केस असणा-या व्यक्तीने पोहताना केस मोकळे सोडून पोहता येणार नाही. त्यासाठी पोहताना वापरावयाची टोपी घालणे बंधनकारक राहील.<br>८. पोहण्यासाठी सभासद होण्यापुर्वी वैद्यकीय अधिका-यांची शारीरिक वैद्यकीय तपासणी करुन घेणे आवश्यक राहील. पाण्यात पोहण्यासाठी सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावा लागेल.<br>९. जलतरण तलाव महत्वाच्या दिवशी (उदा-होळी, धुलीवंदन अशा दिवशी) अथवा अपवादात्मक परिस्थितीत बंद ठेवण्याचे अधिकार मा.आयुक्त यांनी प्राधिकृत केलेल्या विभाग प्रमुखांस राहतील.<br>१०. पोहण्याचे विशिष्ट गणवेश (Swimmimg costume) परिधान केल्याशिवाय तरण तलावात प्रवेश करण्यास सक्त मनाई असेल. आपआपले दागदागिने, मौल्यवान वस्तु,मोबाईल इ. स्वत:च्या जबाबदारीवर ठेवावेत. हरविल्यास त्यास मनपा कार्यालय अथवा कर्मचारी जबाबदार राहणार नाही.<br>११. पोहता येत नसेल तर एकट्याने पोहण्याचा प्रयत्न करु नये.आपल्या पोहण्याच्या क्षमतेची जाणीव ठेवूनच मर्यादीत वेळेपर्यंत व अंतरापर्यंतच राहून पोहणे सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य राहील.<br>१२. पोहण्यापुर्वी प्रमाणापेक्षा जास्त आहार घेऊन नये, त्यामुळे पाण्यात स्नायू युक्त गोळे येणेची शक्यता असते. भरल्यापोटी पोहणे टाळावे.<br>१३. पोहण्यासाठी पाण्यात उतरण्यापुर्वी शरीरात योग्य ते तापमान निर्माण होण्यासाठी योग्य तेवढा वार्मअप करावा परंतु इतर खेळ खेळल्याने शरीराचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले असतांना व दमलेले असतांना पोहण्यासाठी पाण्यात उतरणे धोक्याचे असल्याने पाण्यात उतरु नये.<br>१४. आपणास ज्यावेळी उंचीवरुन सुर उडी पाण्यात मारायची असेल, तेंव्हा त्या भागात दुसरा कोणी नाही याची खात्री करुन घेऊनच उडी मारावी,यामध्ये आपणास व दुस-यांना इजा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>१५. गेस्ट तिकीट फक्त पोहता येत असेल त्यांनाच देण्यात येईल.<br>१६. प्रत्येकांने स्वत:च्या जबाबदारीवरच पोहावे जिवितास कांही झाल्यास महापालिका जबाबदार असणार नाही.<br>१७. तरण तलावाच्या आवारात कोणासही परवानगी शिवाय प्रवेश करण्यास सक्त मनाई असेल.<br>१८. ओळखपत्राशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.<br>१९. जलतरण तलाव सराव/स्पर्धा आयोजना दरम्यान व नंतर त्याठिकाणी स्वच्छता व सुव्यवस्था राहील याची संपुर्ण जबाबदारी संबंधित अर्जदारांची राहील. संबंधितांकडून तसे न झाल्यास अनामत रक्कमेमधून दंडात्मक रक्कम वसुल करण्यात येईल.<br>२०. अनामत रक्कम हे भाडे शुल्कासोबत एकत्रित महापालिकेच्या नावे जमा करावे लागतील. सदरचे अनामत रक्कम ही सुविधा वापराअंती शहानिशा करुन संबधीतांस परत केला जाईल.<br>२१. महापालिकेच्या स्पर्धा/कार्यक्रमाकरीता तसेच महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना सदरहू क्रीडा सुविधा विनामुल्य राहील.<br>२२. ज्या स्पर्धा/सरावाकरीता आरक्षण केलेले आहे, तो रद्द झाल्याचे संबंधितांनी आरक्षण दिवसाच्या १० दिवस अगोदर कळविल्यास भाडे रक्कमे मधून २५%, ७ दिवस अगोदर कळविल्यास ४०% व ०५ दिवस अगोदर कळविल्यास ५०%एवढी रक्कम वसूल करण्यात येईल व त्यानंतर आरक्षण रद्द झाल्याचे कळविल्यास संपुर्ण भाडे रक्कम जप्त करण्यात येईल व त्याबदल्यात इतर कोणताही दिवस दिला जाणार नाही.<br>२३. सदर सुविधा Online पध्दतीनेसुध्दा प्रथम आरक्षित करण्या-यास प्रथम प्राधान्याने सशुल्क उपलब्ध राहील.<br>२४. कोणतेही कारण न देता १० दिवस अगोदर नोटीसीद्वारे आरक्षण रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.<br>२५. नवी मुंबई महानगरपालिका आयोजित वा पुरस्कृत स्पर्धा/कार्यक्रमांना सदर सुविधांची आवश्यकता असल्यास दिलेले आरक्षण रद्द करण्याचा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे.<br>२६. जलतरण तलाव परिसरात मादक व प्रतिबंधीत द्रव्य/वस्तु बाळगणे अथवा त्यांचे सेवन करणे यास सक्त मनाई असेल. तसे आढळून आल्यास अशा संस्था/क्लब/ खेळाडू/ प्रेक्षक यांना सदर ठिकाणी प्रवेश नाकारला जाईल व आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.<br>२७. जर शाळा/विद्यालयातील विद्यार्थी यांनी सराव/स्पर्धांकरीता आरक्षित केले असल्यास सदर सुविधा वापरतांना |

ओळखपत्र असणे बंधनकारक राहील. संबंधित प्राधिकृत ओळखपत्रा शिवाय प्रवेश देण्यात येणार नाही.

२८. जलतरण तलाव वापराचे दिनांक, वेळ यांचेमध्ये कोणताही बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना असतील. मात्र भाडे शुल्क ठरविण्याचे अधिकार मा.महापालिका सभेस असतील.

२९. भाडयाने देण्याचे सर्वाधिकार क्रीडा विभागाचे विभाग प्रमुख यांना राहतील तथापी विभागप्रमुखांच्या अनुपस्थितीत/रजा कालावधीत किंवा विशिष्ठ परिस्थितीत सदरचे अधिकार कार्यालय प्रमुखांना असतील.

**३०.** जलतरण तलावावर चित्रिकरण करावयाचे झाल्यास त्याबाबत इतर शासकीय विभागाचे आवश्यक अनुज्ञाप्ती,ना-हरकत दाखले/परवाने घेण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

**३१.** जलतरण तलावावर लग्न समारंभ, जाहिर सत्कार, राजकीय सभा, सत्संग, मेळावे, ऑर्केस्ट्रा, धार्मिक कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमांना परवानगी देण्यात येणार नाही.

सदरहू जलतरण तलाव वापराकरीता खालील प्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

**नमुंमपा घणसोली, से-३ येथील सेंट्रल पार्क मधील जलतरण तलाव वापराबाबतचे प्रस्तावित शुल्क दर.**

| अ.क्र. | सेवा | प्रस्तावित दर (रु.) | | | सुरक्षा अनामत रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| | | सन २०२२-२३ | सन २०२३-२४ | सन २०२४ -२५ | |
| १. | प्रवेश शुल्क वार्षिक | ४८०/- | ५३०/- | ५८०/- | --- |
| २. | १. वार्षिक सभासद शुल्क (वय ५ ते १५ वर्षापर्यंत, जेष्ठ नागरिक, राष्ट्रीय खेळाडू, महापालिका अधिकारी/ कर्मचारी) | २५००/- | २७५०/- | ३०२५/- | --- |
| | २. वार्षिक सभासद शुल्क (वय १५ वर्षावरील) | ५०००/- | ५५००/- | ६०५०/- | --- |
| ३. | जल निर्देशक (कोचिंग) शुल्क वार्षिक | ५००/- | ५५०/- | ६०५/- | --- |
| ४. | ओळखपत्र शुल्क | ३००/- | ३३०/- | ३६५/- | --- |
| ५. | पालकांकरीता प्रवेश शुल्क वार्षिक | ६००/- | ६६०/- | ७३०/- | --- |
| ६. | आकस्मीत (गेस्ट) पोहण्याचे शुल्क ताशी | १००/- | ११०/- | १२०/- | --- |
| ७. | गॅलरी शुल्क | १०००/- | ११००/- | १२००/- | --- |
| ८. | वार्षिक सभासद अर्ज शुल्क | १५०/- | १६५/- | १८५/- | --- |
| ९. | लॉकर शुल्क वार्षिक | ९००/- | ९९०/- | १०९०/- | --- |
| १०. | लॉकर अनधिकृत वापर दंड वार्षिक | १८००/- | १९८०/- | २१८०/- | --- |
| ११. | क्रीडा स्पर्धा आरक्षण ताशी शुल्क | ३०००/- | ३३००/- | ३६३०/- | ५०००/- स्पर्धा कालावधीसाठी |
| १२. | शासन मान्यता प्राप्त शाळा/संस्था स्पर्धेकरीता ताशी शुल्क | २०००/- | २२००/- | २४२०/- | ५०००/- स्पर्धा कालावधीसाठी |
| १३. | शासन मान्यता प्राप्त शाळा/संस्था (मासिक आरक्षण- प्रति दिन प्रति तास) (फक्त मंगळवार ते शुक्रवार) | ६०००/- | ६६००/- | ७२६०/- | १००००/- मासिक कालावधीसाठी |
| १४. | आरक्षण जलजीवरक्षक (२) ताशी शुल्क | १५००/- | १६५०/- | १८१५/- | --- |
| १५. | नवीन ओळखपत्र (दुसरी प्रत) | ३००/- | ३३०/- | ३६५/- | --- |
| १६. | नुतनीकरण विलंब शुल्क | ४००/- | ४४०/- | ४८५/- | --- |
| १७. | सुट्टीमधील विशेष प्रशिक्षण शुल्क | ३०००/- | ३३००/- | ३६३०/- | --- |
| १८. | चित्रीकरणासाठी (मराठी) (मालिका/चित्रपट/ॲडफिल्म) ताशी शुल्क | ८०००/- | ८८००/- | ९६८०/- | रु.५००००/- चित्रिकरण कालावधीसाठी |
| | | (मंगळ. ते शुक्रवार) | | | |
| | | १००००/- | ११०००/- | १२१००/- | |
| | | (शनिवार,रविवार व सार्व.सुट्टी) | | | |
| १९. | चित्रीकरणासाठी (मराठी व्यतिरिक्त) (मालिका/चित्रपट/ॲडफिल्म) ताशी शुल्क | १२०००/- | १२१००/- | १३३१०/- | रु.५००००/- चित्रिकरण कालावधीसाठी |
| | | (मंगळ. ते शुक्रवार) | | | |
| | | १४०००/- | १५४००/- | १६९४०/- | |
| | | (शनिवार,रविवार व सार्व.सुट्टी) | | | |
| २०. | उपरोक्त प्रस्तावित दरा व्यतिरिक्त वेळोवेळी लागू होणारे सर्व शासकीय कर लागू राहतील. | | | | |
| २१. | १) शासन मान्यता प्राप्त शाळा/संस्थांना एका वेळी २० स्विमर्सना सरावाकरीता उपरोक्त अ.क्र.१४ प्रमाणे प्रति महिना दर राहील. २० स्विमर्स नंतर प्रत्येक स्विमर्स रु.५०/- प्रति तास प्रति दिन याप्रमाणे शुल्क राहील. एकावेळेस जास्तीत जास्त ३० स्विमर्स सराव करु शकतील.<br>२) अनामत रक्कम ही एका तासाकरीता भरुन पुढे सलग आरक्षण असल्यास आणि वापराच्या वेळेस कोणतेही नुकसान केले नसल्यास सदरचे अनामत रक्कम पुढील आरक्षणाकरीता असे एका महिन्यापर्यंत ग्राह्य धरण्यात येईल याकरीता पुन्हा स्वतंत्रपणे अनामत रक्कम भरणे अनिवार्य राहणार नाही. केवळ भाडे शुल्क भरावे लागेल.<br>३) ओळखपत्राची मुदत संपलेल्या दिनांक पासुन सात दिवसानंतर विलंब शुल्क आकारुन नुतनीकरण करण्यात येईल. मात्र मुदत संपल्या दिनांकापासून १५ दिवसानंतर नुतनीकरण केले जाणार नाही.<br>४) नवीन प्रवेश घेणा-या स्विमर्स सभासदांसाठी जलनिर्देशक (कोचिंग) शुल्क आकारण्यात येणार नाही. | | | | |

तरी, उपरोक्त प्रस्तावित केल्याप्रमाणे जलतरण तलाव वापराचे धोरण सादर करण्यात येत असून सदर अटी व शर्तीस अनुसरुन शुल्क दर लागू करण्यास, तसेच यापुढे दर तीन वर्षानी शुल्कामध्ये १०% टक्यांनी वाढ करण्यास, **प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. आयुक्त तथा मा. प्रशासक यांची प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**नगरसचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**सही/-**
**(अभिजीत बांगर)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**नवी मुंबई महानगरपालिका**

| | |
|---|---|
| विषय क्र. ०२. दि. २५ मे, २०२२. | घणसोली विभागातील सम्राटनगर येथील अण्णाभाऊ साठे मैदानाची सुधारणा करणे या कामातील जादा, अतिरिक्त व बचत (Excess, Extra & Saving) खर्चास मंजूरीबाबत, आयुक्तांचे दिनांक २५/०५/२०२२, चे पत्र जा.क्र.नमुंमपा/श.अ./१५५१/२०२२. |
| ठराव क्रमांक २३३५ | "उपरोक्त संदर्भात घणसोली विभागातील सम्राटनगर येथील अण्णाभाऊ साठे मैदानाची सुधारणा करणे या कामातील जादा, अतिरिक्त व बचत (Excess, Extra & Saving) खर्चास मंजूरीबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे, सदर कामाची अतिरिक्त व बचत बाबी मिळून कामावर खर्च होणारी एकुण सुधारीत खर्चाची रक्कम रुपये ५१,९२,०५५/- इतकी असून ती मूळ प्रशासकीय मंजूरी रक्कम रुपये ५५,२५,९८१/- पेक्षा कमी असली तरी सुधारीत खर्चास मा. प्रशासक यांची मान्यता आवश्यक आहे. उपरोक्त प्रमाणे सदर कामावरील निव्वळ बचत रक्कम रुपये ४४,९२८/- इतकी असून एकुण सुधारीत खर्च रुपये ५१,९२,०५५/- (अक्षरी रुपये एकावन्न लक्ष ब्याण्णव हजार पंचावन्न मात्र) इतक्या रक्कमेस प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ७३(क) अन्वये मा. आयुक्त तथा मा. प्रशासक यांची वित्तीय मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>घणसोली विभागातील सम्राटनगर येथील अण्णाभाऊ साठे मैदानाची सुधारणा करणे या कामातील जादा, अतिरिक्त व बचत (Excess, Extra & Saving) खर्चास मंजूरीबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०२ ठराव क्रमांक २३३५ अन्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे, सदर कामाची अतिरिक्त व बचत बाबी मिळून कामावर खर्च होणारी एकुण सुधारीत खर्चाची रक्कम रुपये ५१,९२,०५५/- इतकी असून ती मूळ प्रशासकीय मंजूरी रक्कम रुपये ५५,२५,९८१/- पेक्षा कमी असली तरी सुधारीत खर्चास मा. प्रशासक यांची मान्यता आवश्यक आहे. उपरोक्त प्रमाणे सदर कामावरील निव्वळ बचत रक्कम रुपये ४४,९२८/- इतकी असून एकुण सुधारीत खर्च रुपये ५१,९२,०५५/- (अक्षरी रुपये एकावन्न लक्ष ब्याण्णव हजार पंचावन्न मात्र) इतक्या रक्कमेस प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ७३(क) अन्वये मा. आयुक्त तथा मा. प्रशासक यांची वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे. |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

| | |
|---|---|
| विषय क्र. ०३. दि. २५ मे, २०२२. | कोपरखैरणे टि टि सी औद्योगिक क्षेत्रातील महापे येथील भू.क्र.OS-५ या भूखंडावर रोपवाटिका विकसित करणेकरीता संरक्षक भिंत बांधून स्थापत्यविषयक कामे करणे, आयुक्तांचे दिनांक २५/०५/२०२२, चे पत्र जा.क्र.नमुंमपा/श.अ./१५४८/२०२२. |
| ठराव क्रमांक २३३६ | "उपरोक्त संदर्भात कोपरखैरणे टि टि सी औद्योगिक क्षेत्रातील महापे येथील भू.क्र.OS-५ या भूखंडावर रोपवाटिका विकसित करणेकरीता संरक्षक भिंत बांधून स्थापत्यविषयक कामे करणे, प्रस्तावित केल्याप्रमाणे, सदर कामाचे अंदाजपत्रक नमुंमपा दरसुची २०२१-२२ नुसार तयार करण्यात आले असून, त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २७,२६,१५३/- (अक्षरी रुपये सत्तावीस लक्ष सव्वीस हजार एकशे त्रेपन्न मात्र) इतक्या रक्कमेस प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. आयुक्त तथा मा. प्रशासक यांची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>कोपरखैरणे टि टि सी औद्योगिक क्षेत्रातील महापे येथील भू.क्र.OS-५ या भूखंडावर रोपवाटिका विकसित करणेकरीता संरक्षक भिंत बांधून स्थापत्यविषयक कामे करणे, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०३ ठराव क्रमांक २३३६ अन्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे, सदर कामाचे अंदाजपत्रक नमुंमपा दरसुची २०२१-२२ नुसार तयार करण्यात आले असून, त्याची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २७,२६,१५३/- (अक्षरी रुपये सत्तावीस लक्ष सव्वीस हजार एकशे त्रेपन्न मात्र) इतक्या रक्कमेस प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा. आयुक्त तथा मा. प्रशासक यांची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे. |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका